IIP: WJHSS
IIP World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# १२व्या शतकातील स्त्रीसमानतेचा पाया : महात्मा बसवेश्वर यांच्या स्त्रीविषयक कार्याचे ऐतिहासिक विश्लेषण

**डॉ. अमिता जावळे,**
ग्लोबल व्हिलेज आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज ,बोरामणी , सोलापूर.

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***
*महात्मा बसवेश्वर*

**ABSTRACT**

१२व्या शतकात भारतीय समाजव्यवस्था ही ब्राह्मणवादी वर्चस्व, जातीय विषमता आणि पितृसत्ताक मूल्यांनी संरचित झालेली होती. पितृसत्ताक सामाजिक रचनेत स्त्रियांचे स्थान दुय्यम आणि मर्यादित होते. अशावेळी महात्मा बसवेश्वरांनी उभारलेली वीरशैव-लिंगायत चळवळ ही केवळ धार्मिक सुधारणाच नव्हती, तर ती सामाजिक परिवर्तनाचीही चळवळ ठरली . प्रस्तुत शोधनिबंधात बसवेश्वरांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाचे ऐतिहासिक विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. बसवेश्वरांनी 'कायकवे कैलास' या तत्त्वाद्वारे श्रमाला आध्यात्मिक मूल्य दिले आणि स्त्रीच्या श्रमाचेही समान महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी अनुभव मंटपाच्या माध्यमातून स्त्रियांना वैचारिक आणि आध्यात्मिक अभिव्यक्तीचे व्यासपीठ उपलब्ध करून सामाजिक जागृतीची चळवळ सुरू केली. अक्कमहादेवीं सारख्या स्त्री संतांच्या सहभागामुळे स्त्रीला धार्मिक क्षेत्रात स्वतंत्र अस्तित्व आणि सन्मान निर्माण होण्यास मदत झाली . बसवेश्वरांनी जातिव्यवस्था आणि लिंगभेद या दोन्ही संरचनांना वैचारिक पातळीवर आव्हान दिले. त्यांनी आपल्या वचनसंग्रहात समाजातील असमानता, पितृसत्ताक पद्धतीचे वर्चस्व आणि स्त्रियांवरील अन्याय यावर भाष्य केले. त्यांच्या दृष्टिकोनातून स्त्री-पुरुष समानता, स्त्रियांची निर्णयक्षमता, स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबन, आणि धार्मिक-सांस्कृतिक सहभाग यावर भर दिलेला होता. त्यांना पारंपारिक भारतीय समाजातील वर्ण, जातिमूलक उच्चनीचता व विषमता यांची प्रखर जाणीव झाली होती. म्हणूनच त्यांनी चातुर्वर्ण्याला आव्हान देऊन सर्व मानवांना समान मानले. परिणामतः त्यांच्याभोवती सर्व वर्णातील व जातींतील अनुयायी जमा झाले. त्यांनी आंतरजातीय रोटीव्यवहार व बेटीव्यवहार करण्यासदेखिल प्रोत्साहन दिले.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 4%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Javale, Amita.** (2025). १२व्या शतकातील स्त्रीसमानतेचा पाया : महात्मा बसवेश्वर यांच्या स्त्रीविषयक कार्याचे ऐतिहासिक विश्लेषण. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), **461–465.**

प्रस्तावना :- १२व्या शतकात भारतीय समाजव्यवस्था ही ब्राह्मणवादी वर्चस्व, जातीय विषमता आणि पितृसत्ताक मूल्यांनी संरचित झालेली होती. पितृसत्ताक सामाजिक रचनेत स्त्रियांचे स्थान दुय्यम आणि मर्यादित होते. अशावेळी महात्मा बसवेश्वरांनी उभारलेली वीरशैव-लिंगायत चळवळ ही केवळ धार्मिक सुधारणाच नव्हती, तर ती सामाजिक परिवर्तनाचीही चळवळ ठरली . प्रस्तुत शोधनिबंधात बसवेश्वरांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाचे ऐतिहासिक विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. बसवेश्वरांनी 'कायकवे कैलास' या तत्त्वाद्वारे श्रमाला आध्यात्मिक मूल्य दिले आणि स्त्रीच्या श्रमाचेही समान महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी अनुभव मंटपाच्या माध्यमातून स्त्रियांना वैचारिक आणि आध्यात्मिक अभिव्यक्तीचे व्यासपीठ उपलब्ध करून सामाजिक जागृतीची चळवळ सुरू केली. अक्कमहादेवीं सारख्या स्त्री संतांच्या सहभागामुळे स्त्रीला धार्मिक क्षेत्रात स्वतंत्र अस्तित्व आणि सन्मान निर्माण होण्यास मदत झाली . बसवेश्वरांनी जातिव्यवस्था आणि लिंगभेद या दोन्ही संरचनांना वैचारिक पातळीवर आव्हान दिले. त्यांनी आपल्या वचनसंग्रहात समाजातील असमानता, पितृसत्ताक पद्धतीचे वर्चस्व आणि स्त्रियांवरील अन्याय यावर भाष्य केले. त्यांच्या दृष्टिकोनातून स्त्री-पुरुष समानता, स्त्रियांची निर्णयक्षमता, स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबन, आणि धार्मिक-सांस्कृतिक सहभाग यावर भर दिलेला होता. त्यांना पारंपारिक भारतीय समाजातील वर्ण, जातिमूलक उच्चनीचता व विषमता यांची प्रखर जाणीव झाली होती. म्हणूनच त्यांनी चातुर्वर्ण्याला आव्हान देऊन सर्व मानवांना समान मानले. परिणामतः त्यांच्याभोवती सर्व वर्णातील व जातींतील अनुयायी जमा झाले. त्यांनी आंतरजातीय रोटीव्यवहार व बेटीव्यवहार करण्यासदेखिल प्रोत्साहन दिले.

* १२ व्या शतकातील स्त्रियांची सामाजिक स्थिती :-

हर्बर्ट स्पेन्सर या समाजशास्त्रज्ञांच्या मते, " समाजाची प्रगती अथवा अधोगती, विकसितपणा अथवा मागासलेपणा हा मुख्यतः त्या समाजातील स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीवर अर्थात सामाजिक दर्जावर अवलंबून असतो."[1] ज्या समाजात स्त्रियांचा दर्जा जोपासला जातो, स्त्रियांचा सामाजिक दर्जा चांगला असतो त्या समाजाचा जलदगतीने आणि चांगल्याप्रकारे विकास होतो.[2]

भारतात मध्ययुगापर्यंत म्हणजेच १२ व्या शतकापर्यंत स्त्रियांचा सामाजिक दर्जा घसरत चालला होता. तसेच सामाजिक क्षेत्रात उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य, विषमता, मानवा-मानवामध्ये भेद अशी परिस्थिती होती. धार्मिक क्षेत्रात अनिष्ठ चालीरीती, रूढी, परंपरा, कर्मकांडाचे प्राबल्य होते. सर्वच क्षेत्रांतील परिस्थितीमुळे सामान्य माणूस त्रासलेला होता.तत्कालीन भारतीय समाजात स्त्रियांची स्थिती पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेमुळे दुय्यम आणि आव्हानात्मक होती. स्त्रीयांना कुटुंबात व समाजात गौण स्थान होते. स्त्री म्हणजे गुलाम, स्त्री म्हणजे उपभोग्य वस्तू अशी समाजाची धारणा होती. स्त्रीयांवर अन्याय-अत्याचार मोठ्या प्रमाणात होत होते. समाजात सतीपद्धत, बालहत्या, बालविवाह अशा अनिष्ट चालीरिती रुढ होत्या तसेच स्त्री शिक्षणावरही निर्बंध होते. स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत कनिष्ठ दर्जा होता. त्यांना पतीच्या निष्ठेचे प्रतीक म्हणून पाहिले जाई,त्यामुळे पतीची सेवा करणे हेच तिचे परम कर्तव्य मानले जाई.[3] अशावेळी स्त्रीचे त्यागी, सेवाभावी वृत्तीचे स्वरूप समाजाला पटवून देण्याचे कार्य बसवेश्वरांनी केले. स्त्रियांचा उद्धार झाल्याशिवाय कुटुंबाचा व समाजाचा उद्धार होणार नाही, हा त्यांचा दृष्टिकोन होता. स्त्रियांना कुटुंबात व समाजात स्वातंत्र्य व समानता मिळवून देण्याचे कार्य त्यांनी केले. कोणत्याही कालखंडाच्या इतिहासाचे सूक्ष्म अवलोकन केले असता असे दिसून येते की भारतीय स्त्रीला मिळालेला सामाजिक दर्जा हा पुरुषांच्या तुलनेत दुय्यम गौण आणि कनिष्ठ प्रतीचाच होता. मध्ययुगीन कालखंडात अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांच्या राजकीय सामाजिक व आर्थिक हक्कांबाबत प्रयत्न केले परंतु बसवेश्वरांनी धार्मिक क्षेत्रात सुद्धा त्यांना पुरुषांइतका हक्क मिळावून दिला. त्यांनी १२व्या शतकात 'स्त्री-पुरुष समानता' या संकल्पनेला खऱ्या अर्थाने ऐतिहासिक महत्व प्राप्त करून दिले. तसेच सर्वच क्षेत्रात स्त्रिया यशस्वी होऊ शकतात हे सिद्ध केले. काही क्षेत्रात तर स्त्रिया पुरुषांपेक्षा कणभर सरस ठरतात हेही त्यांनी दाखवून दिले म्हणूनच स्त्रीमुक्तीची चळवळ महात्मा बसवेश्वरांनी सुरू केली आणि त्यात ते यशस्वी देखिल झाले.[4]

* महात्मा बसवेश्वर: महात्मा बसवेश्वर हे भारतातील एक महान दर्शनी व्यक्तिमत्व होते. अंधविश्वास जोपासणाऱ्या आणि रुढी ,परंपरा , कर्मकांड,धार्मिक सामाजिक व्यवस्थेला विरोध करणारे महान क्रांतिकारक म्हणून महात्मा बसवेश्वरांचे स्थान महत्त्वपूर्ण ठरते. त्यांनी शिवभक्तांसाठी आणि शिवयोग्यांसाठी एक विशेष पीठ स्थापन केले होते त्यालाच 'अनुभव मंटप' हे नाव दिले.[5] अनुभव मंटपाद्वारे त्यांनी सर्व जातींना मुक्तद्वार खुले केल्याने जातीयता नष्ट करण्याचे कार्य त्यांच्या हातून सहजतेने घडून आले. हे अनुभव मंटप ज्याप्रमाणे सर्व जाती-धर्मासाठी मुक्तद्वार होते त्याचप्रमाणे त्या ठिकाणी स्त्री पुरुष समानता ही होती. त्यांनी अनुभव मंटपाद्वारे सामाजिक क्रांतीच घडवून आणली होती . या ठिकाणी समता आणि बंधुता ही मुख्य सूत्री असल्याने उचनिच, जातपात, लिंगभेद त्यांनी मोडीत काढला.[6] या अनुभव मंटपामुळे अनेक स्त्रियांना समाजात मोठी प्रतिष्ठा मिळाली. अक्कमहादेवी या साधवीने आपल्या अद्भुत चरित्र आणि चारित्र्याने तसेच तेजस्वी व्यक्तिमत्वाने पुरुषप्रधान समाज व्यवस्थेला धक्का दिला. [7]

* महात्मा बसवेश्वरांचे स्त्रीविषयक कार्य :- रंजल्यागांजल्या व पददलितांना समानतेच्या सूत्रात बांधणारे केंद्र म्हणजे अनुभव मंटप होय. स्त्रियांची गुलामगिरी नष्ट करून त्यांना पुरुषांच्या बरोबरीने समान स्थान मिळाले पाहिजे. म्हणजेच नऊशे वर्षांपूर्वी महात्मा

बसवेश्वरांनी समाजवादी समाजरचनेचा पाया घातला होता, हे स्पष्टच दिसून येते. महात्मा बसवेश्वरांना स्त्री शक्तीचा साक्षात्कार त्यांच्या बहिणीमुळे झाला त्यामुळे ते स्त्रीला कधीच अबला समजत नव्हते. बसवेश्वरांच्या उदार दृष्टीकोनामुळे अनुभव मंटपात स्त्रियांचा सहभाग खूप मोठ्या प्रमाणावर होता. पुरुषांप्रमाणे स्त्रीला धर्माचरण करता यावे असे त्यांना वाटे.[8] त्यांची स्त्री विषयक दृष्टी म्हणजे स्त्रीच्या स्वातंत्र्याची सनद आहे. स्त्रीच्या भोवती बांधण्यात आलेल्या गुलामगिरीच्या भिंती बसवेश्वरांनी कणखरपणे पाडून टाकल्या. मध्ययुगीन समाज व्यवस्थेत स्त्री स्वातंत्र्याची पताका फडकवत ठेवण्याचे महत्वाचे कार्य त्यांनी केले.[9] "दि टाइम्स ऑफ इंडियाच्या" अग्रलेखा नुसार, बसवेश्वरांनी त्याकाळी स्त्रीमुक्ती तसेच सुधारणा यासाठी प्रचंड कार्य केले. बालविवाह ,विधवांची गुलामगिरी ,स्त्रियांची उन्नती यासाठी त्यांनी विधायक व तेजस्वी प्रयत्न केले. आज सुद्धा प्रत्येक वर्षी या विषयावर परिषदा होतात. मात्र बसवेश्वरांच्या तुलनेत त्या नगण्यच आहेत. हेच त्यांच्या चळवळीचे वैशिष्ट्य मानले जाते .[10] बाराव्या शतकात बसवेश्वरांनी बहुउद्देशीय महिला संघटना उभारल्या होत्या. त्यांनी स्त्रीमुक्तीची संकल्पना आणि चळवळ चालवून स्त्रियांच्या विविध प्रश्नांकडे देशवासियांचे लक्ष वेधून घेतले असेच म्हणावे लागेल.

* धार्मिक स्वातंत्र्य :- महात्मा बसवेश्वरांमुळे वीरशैव धर्माचा आणि समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा विशेष वैशिष्ट्यपूर्ण दृष्टिकोन वीरशैवांच्या आगम ग्रंथात तसेच वचनग्रंथात बऱ्याच ठिकाणी व्यक्त झालेला आहे. त्यांनी स्त्रियांना धार्मिक, अध्यात्मिक ,शैक्षणिक ,आर्थिक, व्यावसायिक ,राजकीय आणि एकंदरीत सामाजिक स्वातंत्र्य, हक्क आणि अधिकार मोठ्या प्रमाणात दिलेले आहेत. वीरशैव धर्माने स्त्रियांना कोणत्याच अवस्थेत अपवित्र ,अपात्र अस्पृश्य, अशुभ न मानता समान सामाजिक दर्जा बहाल केलेला आहे. यासंदर्भात बेंजामिन वॉकर म्हणतात, की वीरशैव स्त्रियांचे स्थान पुरुषांच्या बरोबरीचे असते ऋतू काळात देखील त्यांना अशुद्ध अथवा अस्पृश्य मानले जात नाही.[11] यावरून वीरशैव समाजातील स्थान आपल्या लक्षात येते. वीरशैवांमध्ये दीक्षा हा प्रमुख वीरशैव संस्कार स्त्री आणि पुरुषांना सारखाच आहे. ईष्टलिंग धारणा, विभूती धारणा, रुद्राक्ष धारणा व एकूण धर्माचरण स्त्री व पुरुषांसाठी समान असल्याने बसवेश्वरांनी यातून स्त्री-पुरुष समानतेचा पायाच घातला असे म्हणावे लागेल.[12] बसवेश्वराचे समकालीन सहकारी सिद्धरामेश्वर यांनी नारी ही माया नसून ती प्रत्यक्ष कपिलसिद्ध मल्लिकार्जुनच आहे म्हणजेच ती देवता आहे असे गौरव उद्गार स्त्रीबद्दल काढलेले आहेत.[13] याबाबतची महत्त्वपूर्ण उदाहरणे म्हणजे बसवेश्वरांच्या समकालीन महिला अक्कमहादेवी आणि दानम्मा हे होय.

* स्त्रीशिक्षण :- महात्मा बसवेश्वरांनी स्त्री शिक्षणाचे मूलगामी व दूरगामी परिणाम जाणले होते त्यामुळेच त्यांनी स्त्री शिक्षणाला देखील महत्त्व दिल्याचे दिसून येते. कारण स्त्री शिक्षण स्त्री प्रौढ शिक्षण स्त्री साक्षरता स्त्रियांचे व्यवसायिक शिक्षण इत्यादी संकल्पनांना १२ व्या शतकापासून महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते याबाबत महत्त्व स्पष्ट करताना लल्लेश्वरी मुगी म्हणतात, "महात्मा बसवेश्वरांची पत्नी शरणी गंगाबिका यांच्या नेतृत्वाखाली कल्याणात ठिकठिकाणी स्त्री शिक्षणाची केंद्रे उघडण्यात आली होती. तसेच प्रौढ स्त्रियांसाठी कायक केंद्र निर्माण केली होती." त्यातून विविध कुटीर उद्योगांचे शिक्षण स्त्रियांना दिले गेले. यामधील सुतकताई विभाग,वेळुकाम विभाग, बुरुड विभाग, सुतार काम अशा विविध विभागावर स्त्रियांच्या नेमणुका करण्यात आल्या होत्या. ज्या स्त्रियांना केंद्रात जाऊन शिक्षण घेणे जमत नव्हते अशा स्त्रियांच्या घरी जाऊन हे व्यावसायिक शिक्षण दिले जाई.यावरून स्त्री शिक्षणाचा त्यांनी घेतलेला ध्यास व त्यासाठीच्या प्रयत्न आपल्या लक्षात येतात.महात्मा गांधीजींच्या खादी ग्रामउद्योगाच्या चळवळीचे मूळ देखील १२व्या शतकातील वीरशैव चळवळीतच आढळून येते.[14]

धर्मग्रंथांचे पठण स्त्रियांनी करू नये असा प्रतिगामी विचार आजही आपल्या भारतीय समाजात रूढ आहे. मात्र बसवेश्वरांनी हे विचार खोडून काढलेले होते. त्यांच्या अनुभव मंटपामध्ये स्त्रियांना धार्मिक ग्रंथांचे वाचन करण्यास परवानगी तर दिलेली होतीच पण स्त्रियांच्या हातून वांग्मय निर्मिती कशी होईल याकडेही त्यांनी लक्ष दिलेले होते. त्यामुळेच १२ व्या शतकात अनेक स्त्रिया वचनकार उदयाला आल्याचे आपल्याला दिसून येते. त्यापैकीच लल्लेश्वरी मुगी यांनी 'सन्तिनी बसव युगातील' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. तसेच अक्कमहादेवी, नागलंबिका, गंगाम्बीका, निलांबिका, लिंगम्मा, लक्ष्मा, रायम्मा, गंगम्मा, विरम्मा, रेकम्मा, बिज्जलादेवी, प्रतारगोरी, इत्यादी स्त्री वचनकारांचा समावेश होतो. यापैकी अक्कमहादेवी यांची वचने तर वीरशैव वाङ्मय तसेच कन्नड भाषेच्या समृद्धतेला पोषक ठरलेली आपल्याला दिसून येते. अकमहादेवींना जगनमाता व महायोगिनी अशी विशेषणे आदरभावाने लावली जातात. कारण या भारतातील सर्वप्रथम महिला तत्त्वज्ञ, संत आणि साहित्यिक मानल्या जातात. अक्कमहादेवी यांच्या वचन साहित्याचा आधुनिक कन्नड साहित्यिकांवर देखील जबरदस्त प्रभाव पडलेला दिसून येतो. [15] यावरून असे लक्षात येते की धर्मग्रंथ अध्यापनाचे, ईश्वरी उपासनेचे, योग साधनेचे आणि इतरांना अध्यात्म मार्गाचे मार्गदर्शन करणारे हक्क स्त्रियांना देण्यात आले ते महात्मा बसवेश्वरांमुळेच.[16] महिला वचनकारांनी वांग्मय निर्मिती बरोबरच साहित्यशास्त्र व सौंदर्यशास्त्र याबद्दलचेही लिखाण केलेले आहे. याबाबत डॉ.ईश्वरण म्हणतात, :बहुतांशी भारतीय वांग्मयाच्या इतिहासात स्त्रियांचा सहभाग अत्यल्प आहे परंतु १२ व्या व १३ व्या शतकातील कर्नाटकात ५० वर्षाच्या कालावधीत लिंगायत चळवळीच्या माध्यमातून ३४ स्त्री साहित्यिक पुढे आलेले

आहेत. त्यांनी लिहिलेल्या वचन व भक्ती गीतांमुळे लिंगायत धार्मिक सामाजिक क्रांती समृद्ध झाली."[17]

*स्त्री आणि राजकारण :-

महात्मा बसवेश्वरांनी स्त्री पुरुष समानतेच्या संकल्पनेचा अनेक संदर्भात पुरस्कार केलेला होता. त्यांच्या अनुभव मंटपात ७७० शिवशरणासोबत ७० स्त्रिया (शिवशरणी) देखील होत्या आणि या स्त्रिया धार्मिक व सामाजिक विचारमंथनात समानरित्या सहभागी होत्या. तसेच बसवेश्वरांच्या नेतृत्वाखाली महिला संघटना देखील स्थापन झालेल्या होत्या. या संघटनांमार्फत स्त्री शिक्षणाचा प्रसार करणे स्त्रियांना व्यावसायिक शिक्षण देणे स्त्रियांमध्ये राजकीय जागृती निर्माण करणे इत्यादी उपक्रम राबवण्यात आले होते. या कालखंडात काही वीरशैव महिलांनी महिला दल देखील स्थापन केलेले होते.[18]

* विधवा विषयक कार्य :- स्वातंत्र्यापूर्वी भारतात विधवा स्त्रियांवरती अनेक बंधने लादलेली होती. तथापि वीरशैव समाजाने पूर्वीपासूनच विधवा स्त्रियांबाबत व्यापक दृष्टिकोन बाळगलेला दिसून येतो. विधवा स्त्री बाबतचा वीरशैव समाजाचा दृष्टिकोन स्पष्ट दिसून येतो. कारण लिंगायत विधवा कोणत्याही रंगाची साडी परिधान करू शकत, अंतरवस्त्रे व दागिने वापरू शकत मात्र या स्त्रिया नथ, मंगळसूत्र व पायातील जोडवी वापरत नसल्याचे दिसून येते.[19] लिंगायत विधवा मुक्तपणे विवाह समारंभ, पूजा व धार्मिक उत्सवांमध्ये निहसंकोचपणे सामील होऊ शकत, कारण लिंगायत पंथामध्ये स्त्रीला अशुभ मानले गेले नाही तिच्या पतीच्या मृत्यूनंतर मंगळसूत्रा व्यतिरिक्त तिने कोणत्याही दागिन्याचा त्याग करण्याची किंवा केशवपन करण्याची ही गरज नाही या दोन्ही प्रकारचे महात्मा बसवेश्वरांनी फार पूर्वीच समाजातून निर्मूलन केलेले आहे. [20] महात्मा बसवेश्वरांनी विधवा पुनर्विवाहाचे देखील समर्थन केलेले आहे. आज देखील या समाजात विधवा विवाह संमत आहेत. यावरून वीरशैव समाजामध्ये विधवांना असलेले मानाचे स्थान आपल्याला दिसून येते.

* वैश्या स्त्री विषयक दृष्टीकोन :-

विधवांप्रमाणे बसवेश्वरांनी वेश्येकडे वाईट अनैतिक म्हणून दुर्लक्ष केलेले नाही. तीला देखील समाजाचा एक महत्त्वाचा घटक ते मानतात. महात्मा बसवेश्वर आणि त्यांच्या सहकार्यांनी १२ व्या शतकात वेश्यांना मार्गदर्शन करून त्यांचे विवाह घडवून आणले होते. त्यांना आश्रय देऊन त्यांच्यासाठी अर्थार्जनाचे साधन देखील उपलब्ध करून दिलेले होते. धार्मिक बाबतीत आवड असलेल्या वेश्यांना धर्माची शिक्षा देऊन त्यांना अनुभव मंटपामध्ये आत्मिक उन्नतीचे शिक्षण दिले जाई त्यामुळे अशा स्त्रियांना समाजात पून्हा मानाचे स्थान मिळवून देण्याचे कार्य त्यांनी केले. हे सर्व करीत असताना त्यांनी वेश्यांची पुनर्वसन संस्था देखील सुरू केली. यावरून महात्मा बसवेश्वराने तत्कालीन समाज रचनेमध्ये स्त्रीच्या जीवनाचा व त्यांच्या विविध अंगी प्रश्नांचा किती सूक्ष्म विचार केलेला होता हे आपल्याला दिसून येते. [21]

महात्मा बसवेश्वरांच्या स्त्री विषयी असलेल्या उदार दृष्टिकोनामुळेच स्त्री सन्माननीय स्थान मिळू शकली. अक्कमहादेवीने आपल्या अद्भुत चरित्र आणि चारित्र्याने तसेच आपल्या तेजस्वी व्यक्तिमत्वाने पुरुषप्रधान समाज व्यवस्थेला धक्का दिला. तिच्यामुळे अनुभव मंटपाला दिव्यत्व प्राप्त झाले कारण ती स्त्री किंवा पुरुष या संकल्पनेच्या पलीकडे पोहोचली होती. बसवेश्वरांच्या स्त्री विषयी असलेल्या उदार दृष्टिकोनामुळेच स्त्री सन्मानीय स्थान मिळवू शकली तिला शक्ती स्वरूपा, आदरणीय म्हणून तिच्या सर्वांगीण उन्नतीला आवश्यक असणाऱ्या गोष्टींचे त्यांनी समर्थन केले. बालविवाहाला विरोध, पुनर्विवाहाला पाठिंबा, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देऊन त्यांनी १२ व्या शतकात सामाजिक क्रांती घडवून आणली. त्यांनी मधुवैया या ब्राह्मण शिवशरणाची कन्या रत्ना हिचा विवाह चांभार असलेल्या हराळय्याच्या मुलाशी लावून दिला . या विवाहामुळे सनातनी आणि कर्मकांडी लोकांचा त्यांच्याविरुद्धचा संताप वाढलेला होता तरीही त्यांच्या विरोधात जाऊन त्यांनी या दोन्ही शिवशरण कुटुंबांना एकत्र आणले होते.[22] हा आंतरजातीय विवाह म्हणजे त्यांचे आणखी एक पुरोगामी पाऊल होते.

महात्मा बसवेश्वरांच्या कार्याचा परिपाक म्हणजे स्त्रिया आजही सार्वजनिक, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात नेतृत्व करत आहेत.यामुळे बसवेश्वरांचे स्त्रीविषयक कार्य केवळ ऐतिहासिक किंवा धार्मिक दृष्टिकोनातून नाही तर आधुनिक स्त्री सशक्तीकरण आणि लिंग समानतेसाठी मार्गदर्शक ठरते. त्यांचे हे स्त्रीविषयक कार्य समाज सुधारणा, धार्मिक सुधारणा, आर्थिक स्वावलंबन, आणि स्त्री सशक्तीकरण इत्यादी सर्व बाबींमध्ये आदर्श ठरते त्यांच्या विचारांमुळे स्त्रियांना समाजात योग्य स्थान मिळाले आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक निर्णय प्रक्रियेत सहभाग मिळाला रूढीभूत दबाव व पितृसत्तात्मक अडथळयांवर मात करण्याची प्रेरणा मिळाली. आजच्या काळातही बसवेश्वरांचे कार्य स्त्री सशक्तीकरणासाठी प्रेरणास्त्रोत आहे आणि स्त्रियांच्या समानता व न्यायाच्या आंदोलनात मार्गदर्शन करते आहे असेच मानावे लागेल.

निष्कर्ष :

१२व्या शतकातील भारतीय समाजरचना ही जातिभेद, ब्राह्मणवादी वर्चस्व आणि पितृसत्ताक मूल्यांनी नियंत्रित झालेली होती. अशा काळात महात्मा बसवेश्वर यांनी उभारलेली वीरशैव-लिंगायत चळवळ ही केवळ धार्मिक नव्हे तर मूलगामी सामाजिक परिवर्तनाची

चळवळ ठरली. त्यांनी स्त्री-पुरुष समानतेचा विचार केवळ तत्त्वज्ञानापुरता मर्यादित ठेवला नाही, तर तो सामाजिक व्यवहारात उतरविला. अनुभव मंटपाच्या स्थापनेद्वारे स्त्रियांना धार्मिक, वैचारिक आणि साहित्यिक अभिव्यक्तीचे स्वतंत्र व्यासपीठ मिळाले. अक्कामहादेवी यांसारख्या स्त्री वचनकारांच्या सहभागामुळे स्त्रीला अध्यात्मिक आणि बौद्धिक क्षेत्रात स्वतंत्र ओळख प्राप्त झाली. बसवेश्वरांनी स्त्रीशिक्षण, विधवा पुनर्विवाह, आंतरजातीय विवाह, व्यावसायिक स्वावलंबन आणि धार्मिक स्वातंत्र्य यांचा पुरस्कार करून स्त्रीसन्मानाची नवी संकल्पना समाजात रुजविली. वीरशैव समाजातील स्त्रियांचा सामाजिक दर्जा हा त्या काळातील इतर समाजरचनांच्या तुलनेत अधिक समताधिष्ठित आणि मान्यताप्राप्त होता, हे या सर्व बाबींवरून स्पष्ट होते. स्त्रीला अशुद्ध, गौण किंवा केवळ पतीनिष्ठेच्या चौकटीत न पाहता तिला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून स्वीकारणे ही त्या काळातील क्रांतिकारी भूमिका होती. एकूणच, वीरशैव चळवळीने मध्ययुगीन भारतात स्त्रीसमानतेचा पाया घातला. बसवेश्वरांचे स्त्रीविषयक कार्य हे आधुनिक स्त्रीसशक्तीकरणाच्या संकल्पनांचे ऐतिहासिक अधिष्ठान ठरते. त्यामुळे त्यांच्या विचारांचा अभ्यास हा केवळ धार्मिक इतिहासापुरता मर्यादित न राहता सामाजिक न्याय आणि लिंगसमानतेच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतो.

*संदर्भ सूची :-

1. डॉ. संगवे विलास, आदिवासीचे सामाजिक जीवन, पृ. 141.
2. डॉ. मुखर्जी रवींद्रनाथ, डॉ. अग्रवालभरत, समाजशास्त्र, SBPD पब्लिकेशन्स, पृ 17.
3.देशमाने अभिषेक श्रीकांत, लोकशाही जनक महात्मा बसवेश्वर, 2024, पृ.72.
4. डॉ. सरोजिनी शिंत्री, ज्ञानप्रसाद लेख, (बसवेश्वर आणि स्त्री ) फेब्रुवारी 1982,पृ. ८.
5. प्रा. निकम गौतम, संताचे सामाजिक व धार्मिक विद्रोह, विमलकीर्ती प्रकाशन, चाळीसगाव, मे 2010, पृ. 34.
6. डॉ. पाठक प्रभाकर पांडुरंग , राष्ट्रधर्माचे प्रणेते अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर, 2007 , पृ. 88.
7. Wikipedia. Com
8.डॉ.रोडे सोमनाथ, दैनिक सकाळ (लेख), 22 मे 2022
9. डॉ. निर्मलकुमार फडकुले, विदर्भगंगा (साप्ताहिक, नागपूर) मधील लेख, महात्मा बसवेश्वरांची क्रांतिकारक जीवनदृष्टी 11 एप्रिल 1982, पृ. 4.
10. डॉ घुगरे सूर्यकांत, वीरशैव व इतर धर्म आणि समाज,साधना बुक स्टॉल, गडहिंगलज, 2000, पृ.166.
11. हरजींदर सिंह, (संपा.), कास्ट अमंग नॉन हिंदुज इन इंडिया, पृ. 101.
12.मूर्ती श्रीनिवास आणि रामकृष्णन, हिस्टरी ऑफ कर्नाटका, पृ. 146.
13.मुगी लल्लेश्वरी, संतीनी बसवयुगातील, पृ.12.
14. डॉ घुगरे सूर्यकांत, उपरोक्त, पृ. 171.
15. शाब्दिमठ एम. एस., शिवपूजा विधी, पृ.13.
16. डॉ. पाठक प्रभाकर पांडुरंग, उपरोक्त पृ. 90.
17. डॉ ईश्वरन के., रिलीजयन अँड सोसायटी अमंग दि लिंगायत ऑफ साऊथ इंडिया, पृ. 10.
18. डॉ घुगरे सूर्यकांत, उपरोक्त, पृ. 173.
19. कोल्हापूर डिस्ट्रिक्ट गझिटियर, 1960, पृ.14.
20. माता महादेवी, लिंगायतीजम पास्ट अँड प्रेझेंट, पृ. 30.
21. . डॉ घुगरे सूर्यकांत, उपरोक्त, पृ. 175.
22. डॉ. पाठक प्रभाकर पांडुरंग, उपरोक्त पृ. 96.